# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

दुपार

**दिनांक ३०.०५.२०२६ शनिवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक २९.०५.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत म.दा.का. कायद्यान्वये ४३ केसेसमध्ये ४७ ईसमांवर कारवाई करून १,०५,९३०/—रू. चा मुद्देमाल जप्त केला आहे. तसेच, जुगार कायद्यान्वये ०८ केसेसमध्ये ०९ ईसमांवर कारवाई करून ५,३६५/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली ३,०२८ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. २,१३,१५०/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**(गुन्हे)**

**१) पोलीस ठाणे कळमना :— घरफोडी करणाऱ्या आरोपीविरुध्द गुन्हा दाखल.**

फिर्यादी श्री आशिष तुकाराम सदारंग वय ४१ वर्षे रा. प्लॉट क्र. २६०, कावळापेठ, रामसुमेर बाबा नगर, गली क्र. ०३, पोलीस ठाणे शांतीनगर, नागपूर यांचे पोलीस ठाणे कळमणा हद्दीत प्लॉट क्र. ०५, जुना कामठी रोड, नागपूर येथे दादाजी फॅब्रिकेशन व इंजिनियरींग वर्क नावाचे वेल्डींगचे दुकान आहे. दिनांक २८.०५.२०२६ चे १९.०० वा. ते दिनांक २९.०५.२०२६ चे ०७.३० वा. चे दरम्यान, फिर्यादी यांनी त्यांचे नमुद दुकानाचे शटरला कुलूप लावून घरी गेले असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे दुकानाचे शटर कशाने तरी उचकटवून, आत प्रवेश करुन दुकानातील लेथ मशिन, वेल्डींग मशिन, मोटार पंप व वेल्डींगचे इतर साहित्य असा असा एकूण किंमती १,२८,०००/—रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे कळमना येथे पोउपनि ज्ञानेश्वर मोरे ९९७०३५०४६७ यांनी अज्ञात आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३),३३१(४),३३४(१) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरु आहे.

**२) पोलीस ठाणे कपीलनगर :— घातक शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

दिनांक २९.०५.२०२६ चे २१.४० ते २२.१५ वा. चे दरम्यान, कपीलनगर पोलीसांचे पथक हे पोलीस ठाणे हद्दीत पेट्रोलींग करीत असता, त्यांना मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरुन ते बीएसएनएल ऑफीसजवळ, कपीलनगर येथे गेले असता तेथे मिळालेल्या वर्णनाचा इसम दिसल्याने, त्याचे जवळ जात असता, त्या इसमाने त्याचे जवळील लोखंडी शस्त्र जमीनीवर फेकून पळाल्याने, त्याचा पाठलाग करून त्यास ताब्यात घेतले. पंचासमक्ष त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव शिवलाल रजुआ अहिरवार वय ५५ वर्षे

रा. गोसावि आखाडयाजवळ, रानी दुर्गावती चौक, पोलीस ठाणे पाचपावली, नागपूर असे सांगीतले. आरोपीचे ताब्यातुन एक लोखंडी चाकु किंमती २००/— रू. चा जप्त करण्यात आला.

आरोपी हा दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने चाकु घेवुन धुमधाम करतांना समक्ष मिळुन आल्याने व त्याने मनाई आदेशाचे उल्लंघन केल्याने, पोलीस ठाणे कपीलनगर येथे पोउपनि रणजीत ननवरे यांनी आरोपीविरूध्द कलम ४,२५ भा.ह.का., सहकलम १३५ म.पो.का. अन्वये गुन्हा दाखल करून, आरोपीस अटक केली आहे. पुढील तपास सुरू आहे.

## (अकस्मात मृत्यु)

**१) पोलीस ठाणे जरीपटका :—** दिनांक २९.०५.२०२६ चे १५.०० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे जरीपटका हद्दीत, बसस्टॉपसमोर, तिवारी यांचे घरासमोर रोडवर एक अनोळखी पुरूष ईसम अंदाजे ४२ वर्षे वयाचे, बेशुध्द अवस्थेत मिळुन आले. त्यांना पोलीसांनी उपचाराकरीता मेयो हॉस्पिटल नेले असता, डॉक्टरांनी तपासून मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नसून त्याचे नाव जागेश्वर असल्याचे व ते लेबर काम करीत असल्याचे समजले आहे. मृतक इसमास ओळखणाऱ्यांनी पोलीस ठाणे जरीपटका येथे संपर्क साधावा.

याप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरुन पोलीस ठाणे जरीपटका येथे पोउपनि. देवचंद सहारे यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**२) पोलीस ठाणे तहसील :—** दिनांक २९.०५.२०२६ चे ०५.४५ वा. चे सुमारास, पोलीस ठाणे तहसील हद्दीत, सीए रोड, रोकडे बंधु दुकानासमोर रोडवर एक अनोळखी पुरूष ईसम अंदाजे ३५ वर्षे वयाचे, रंग—सावळा, चेहरा—लांब, बांधा—सडपातळ, उंची—५ फुट ५ इंच, डोक्याचे केस—काळे, अंगात—पांढरा शर्ट व काळा फुलपॅन्ट घातलेल्या वर्णनाचे, बेशुध्द अवस्थेत मिळुन आले. त्यांना पोलीसांनी उपचाराकरीता मेयो हॉस्पिटल नेले असता, डॉक्टरांनी तपासून त्यांना मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही.

याप्रकरणी फिर्यादी अभिषेक शिवानंद भारद्वाज वय २६ वर्ष, रा. प्लॉट क्र. ७७९, सीए रोड, सैनी ट्रॅव्हल्स्चे मागे, कोतवाली, नागपूर यांनी दिलेल्या सुचनेवरुन पोलीस ठाणे तहसील येथे पोउपनि. रोहन राणे यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

## (मिसिंग)

**१) पोलीस ठाणे तहसील :—** सुनिता माधवराव निमजे वय ४९ वर्ष रा. टिमकी, पिल्लू पांडे मंदीरमागे, तहसील, नागपूर हया दिनांक २५.०५.२०२६ चे ११.३० वा. पासुन पोलीस ठाणे तहसील हद्दीतील राहते घरी कोणाला काहीही न सांगता कुठेतरी निघुन गेल्या. घरी परत आल्या नाही. त्यांचा शोध घेतला असता मिळून आल्या नाहीत. **वर्णन** रंग—सावळा, चेहरा—गोल, डोळे—काळे, बांधा—साधारण, उंची—५ फुट २ इंच, केस—काळे, अंगात— गुलाबी रंगाचा कुर्ती व पांढरी लॅगीन घातलेली आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलतात.

**२) पोलीस ठाणे तहसील :—** कु.अश्लेषा दिपक पराते वय १९ वर्ष रा. घर क्र. १०६१, तांडापेठ, पाचपावली, नागपूर ही दिनांक २५.०५.२०२६ चे ११.३० वा. पासुन पोलीस ठाणे तहसील हद्दीतील अग्रेसन चौक येथून बेपत्ता झाली आहे. आजपावेतो घरी परत आली नाही. तिचा शोध घेतला असता मिळून आली नाही. **वर्णन** रंग—गोरा, चेहरा—लांब, डोळे—काळे, बांधा—मध्यम, उंची—५ फुट ५ इंच, केस—काळे, अंगात— पांढरी टिशर्ट व प्लॉजो घातलेली आहे. भाषा— हिंदी/मराठी बोलते



सुनिता



कु.अश्लेषा

स्वा/–

( राहुल रोटे )
पोलीस उप निरीक्षक,
पोलीस जनसंपर्क अधिकारी,
नागपुर शहर.